GCR2020012121

गावठाण जमाबंदी प्रकल्प
राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना

# महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास विभाग

### शासन परिपत्रक क्रमांकः गाजप्र-२०१९/प्र.क्र.१३६/पंरा-४

बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: २१ जानेवारी, २०२०

<u>वाचा</u> -

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक,दिनांक २२ फेब्रुवारी,२०१९

<u>प्रस्तावना</u> -

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणामधील जमिनींचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतचा गांवठाण जमाबंदी प्रकल्प ग्रामविकास विभाग, जमाबंदी आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय व भारतीय सर्वेक्षण विभाग,डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यास संदर्भाधीन वाचा येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून गावठाण भूमापन न झालेल्या सर्व गावांचे गावठाण भूमापन करून मिळकत पत्रिका स्वरुपात अधिकार अभिलेख व गावातील मालमत्तांचे GIS प्रणालीवर आधारित मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. या योजनेसंबधी सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणांना प्रकल्पाची माहिती व सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे सुचना पारित करण्यात येत आहेत.

<u>शासन परिपत्रक</u> -

गावठाण जमाबंदी प्रकल्प योजनेत भारतीय सर्व्हेक्षण विभाग (सर्वे ऑफ इंडीया) मार्फत ड्रोनद्वारे गावठाणातील मिळकतींचे सर्वेक्षण करुन, प्रतिमांचे भूसंदर्भीकरण (Geo-referencing) व ऑर्थोरेक्टेफिकेशन करण्यात येईल. त्यानुसार गावठाणातील मिळकतींचा डिजिटाईजड् नकाशा तयार करण्यात येईल. सदर नकाशामधील मिळकतींना (GIS data) ग्रामपंचायतींचे मिळकत रजिष्टर (८-MIS data) जोडण्यात येईल. गावाच्या गावठाण हद्दीतीलच मिळकतींची नियमाप्रमाणे चौकशी करण्यात येऊन मिळकत पत्रिका व सनदा भूमि अभिलेख विभागा मार्फत तयार करण्यात येतील. ग्राम विकास विभाग गावातील मिळकतींचे जी.आय.एस. प्रणालीवर आधारीत मालमत्ता पत्रक तयार करेल.

१. या योजनेचे ग्रामपंचायतींना होणारे फायदे **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद केले आहेत.
२. गावठाण भूमापन योजनेमुळे नागरीकांना/ग्रामस्थांना होणारे फायदे व ग्रामस्थांचे कर्तव्ये व जबाबदा-या **परिशिष्ट "ब"** मध्ये नमूद केले आहेत.

### ३. ग्रामसेवकांच्या जबाबदाऱ्या:-

#### ३. १) ड्रोनव्दारे गांवठाण भूमापनाची पूर्व तयारी :-

##### ३.१.१) गावठाणातील मिळकती संबधी करावयाची कामे :-

३.१.१.१) भूमापन अधिका-यांच्या नियोजनानुसार व सल्ल्याने ग्रामसभा आयोजीत करण्यात यावी, ग्रामसभेमध्ये ड्रोन सर्व्हेक्षणाचे महत्व,फायदे,कार्यपध्दती इ.माहिती भूमापन अधिकारी किंवा भूकरमापक यांचे मदतीने सरपंच , उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायतींच्या विविध उपसमित्या, अन्य लोकप्रतिनिधी व नागरीकांना दयावी, सदरील प्रक्ल्पाची जनजागृती करावी. सोबतच्या **परिशिष्ट "ब"** नुसार जाहिर निवेदन - माहिती पत्रक ग्रामस्थांना पुरविण्यात यावे .

३.१.१.२) गावातील,गावठाणातील सर्व मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक , पत्ते व उपलब्ध असल्यास ई-मेल-आयडी प्राप्त करुन घेणे, सदर माहिती ग्रामपंचायत नमुना ८ मध्ये संबंधित मिळकत धारकाच्या नोंदी मध्ये नवीन रकाना उपलब्ध करुन दिला जाईल त्यामध्ये नमूद करावे व संगणक प्रणालीत अद्ययावत करून घ्यावे . मिळकत धारकाचे भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी उपलब्ध नसल्यास त्यांच्या जवळच्या नातेवाईकांचे भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी प्राप्त करुन घ्यावे.

३.१.१.३) गावठाणा मध्ये घर असलेले परंतु गावात सध्या राहत नसलेले (Non- Resident *Villagers* -NRV )मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी व सद्याचे पत्ते प्राप्त करुन ग्रामपंचायत नमुना ८ मध्ये नमुद करावे व त्यांना गावठाण भूमाप नाबाबत माहिती कळविणे व सदर माहिती भूमापन विभागाकडे देणे.

३.१.१.४) गावठाण हद्द निश्चितीसाठी समक्ष जागेवर हजर राहून भूमापक यांना आवश्यक ते सहकार्य करावे. गावठाण हद्द निश्चितीचे कायम खुणाचे संधारण /जतन करणे. संबंधीत भूमापन अधिकारी यांनी आयोजीत केलेल्या बैठकीस हजर राहणे व गावठाण भूमापनासंबंधी आवश्यक ती मदत करणे.

३.१.१.५) सध्याची कर आकारणी नोंदवही (Tax Assessment Register/नमुना ८) अद्ययावत करावे, सर्व कायदेशीर हस्तांतरणाच्या तसेच वारस नोंदी तात्काळ अद्ययावत करुन घेणे. जेथे एकत्रित कुटुंब मॅनेजर अशी नोंद आहे येथे नियमाप्रमाणे वारस नोंदी करुन घेण्यात याव्यात. आवश्यकतेनुसार प्रलंबित नोंदी ग्रामपंचायत अधिनियमाचे

३.१.१.१२) स्थानिक स्वराज्य संस्थांकडील मालमत्ता करांची नोंद करण्याबाबत महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक-एसटीपी-२१८९/प्र.क्र.६७३/भाग-२/म-१, दिनांक २ डिसेंबर,१९८९ रोजीच्या शासन निर्णयान्वये व महसूल व वन विभाग ,परिपत्रक क्र.नोंदणी १०९३/२४८४/प्र.क्र.८२१/म-१,दिनांक २७ मार्च,१९९५ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

३.१.१.१३) गावठाण भुमापनासाठी मिळकत धारकांना वैयक्तिक नोटीस ग्रामपंचायतीमार्फत बजावून त्यांची पोच घ्यावी. जर मिळकत धारक उपलब्ध नसतील तर सदरील नोटीस प्रत्येक मिळकतीच्या मुख्य दरवाजावर लावण्यात यावी.

**३.१.२)गावठाणा बाहेरील व वाडी/वस्ती मधील मिळकतीच्या अनुषंगाने करावयाची कामे:-**

३.१.२.१) वाडी/वस्ती/ तांडे/टोले/पाडे की ज्यामध्ये कमीत कमी १५ घरे आहेत अशा वाडी/वस्त्यांचे भूमि अभिलेख विभागाने पुरविलेल्या उपग्रह नकाशावर भूमि अभिलेख विभागाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार चिन्हांकन करावे . सर्व चिन्हांकीत नकाशे संबधीत उप अधीक्षक,भूमि अभिलेख यांचेकडे द्यावेत.

३.१.२.२) वाडी/वस्त्यावरील सर्व मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक , पत्ते व उपलब्ध असल्यास ई-मेल-आयडी प्राप्त करुन घेणे. ग्रामपंचायत नमुना ८ मध्ये संबधीत मिळकत धारकाच्या नोंदीतील शेरा रकाना मध्ये नमूद करावे व संगणक प्रणालीत अद्ययावत करून घ्यावे. *मिळकत धारकाचे भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी उपलब्ध नसल्यास त्यांचे जवळच्या* नातेवाईकांचे भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी प्राप्त करुन घेणे.

३.१.२.३) प्रत्येक मिळकतीच्या मुख्य दरवाज्यावर दर्शनी भागात ग्रामपंचायत मिळकत क्रमांक स्पष्टपणे दिसेल अशा पध्दतीने खडूने टाकावा.

## ३.२) ड्रोनव्दारे गावठाण भुमापन करण्याच्या आदल्या दिवशीची तयारी -

३.२.१) ड्रोनव्दारे गावठान भुमापन करणेच्या नियोजीत तारखेचे एक दिवस अगोदर ड्रोनव्दारे गावठाण भूमापन करणेबाबत भूमापन करण्याच्या कार्यपध्दती, सिंमांकनाचे महत्त्व इ. बाबतची माहिती ग्रामस्थाना पून्हा देणे. सिमांकन साठी सहकार्य करणेबाबत गावामध्ये दवंडी देणे.

३.२.२) चुन्याचा वापर करून खाजगी मिळकतींचे सिमांकन कसे करावे ,कोणत्या मिळकतीचे सिमांकन करावे, कोणत्या मिळकतीचे करु नये याबाबत भूमि अभिलेख विभागा मार्फत सुचना देण्यात येतील त्याप्रमाणे कार्यवाही करावी . आवश्यकता असल्यास या कामासाठी गावातील सेवाभावी संस्था, मंडळ यांची मदत घ्यावी.

३.२.३) वादग्रस्त मिळकतीबावत सेवाभावी संस्था, मंडळ व ग्रामसेवक यांनी वादग्रस्त मिळकत धारक यांचे समुपदेशन करणे.

३.२.४) खाजगी मालकीच्या बांधीव मिळकती सोबत आंगण असणा -या मिळकतीचे व खाजगी मालकी हक्काच्या खुल्या मिळकतींचे सिमांकन करण्यासाठी संबधीत मिळकत धारकास मार्गदर्शन करावे.

३.२.५) फक्त बांधीव मिळकत असेल व सोबत आंगण नसेल तर सिमांकन करु नये.

३.२.६) शासकीय,सार्वजनिक वापराच्या मिळकतींचे व ग्रामपंचायत मिळकतींचे सिमांकन चुन्याचा वापर करून भूकरमापक/तलाठी यांच्या मदतीने करुन घ्यावे.

३.२.७) विविध विभागाच्या मालकीच्या मिळकती व विविध खात्यांना प्रदान करण्यात आलेल्या ग्रामपंचायत मिळकती भूमि अभिलेख विभाग ठरवून देतील त्याप्रमाणे सिमांकन संबधीत विभागामार्फत करुन घेणे, संबंधीत विभागाचे प्रतिनिधी यांना सहाय्य करणे.

३.२.८) ड्रोनद्वारे भूमापन करतांना खुल्या, मोकळया जागा, आणि गावातील रस्ते इतर शासकीय व सार्वजनिक मिळकतीचे हक्का बावत बाधा होणार नाही याची काळजी घेणे.

३.२.९) गावठाणातील शासकीय, सार्वजनिक,ग्रामपंचायत मिळकतींचे, सिमांकन करण्यासाठी मनुष्यबळ (सर्वसाधारण पणे ४ मजूर किंवा गावातील मिळकतींचे संख्यानुसार अतिरिक्त मजूर), चुना इ. सामुग्री उपलब्ध करुन देणे व यावाबतचा खर्च संबंधीत ग्रामपंचायतीने (शासन निर्णय क्रमांक:चौविआ-२०१५/प्र.क्र. २६/वित्त-४,ग्रामिण विकास व जलसंधारण मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.३०/८/२०१९ ) नुसार १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अर्थ सहाय्यातून करावयाचा आहे.

३.२.१०) गावठाणातील ड्रोनद्वारे भूमापन करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व पूर्व तयारी पूर्ण झाली आहे काय? यावावतची तपासणी सूची **परिशिष्ट "क"** तयार करण्यात आली आहे. सदर सुचीमध्ये तपशील नमूद करुन ग्रामसेवक यांनी दिनांकीत स्वाक्षरी करुन संबंधीत उप अधीक्षक , भूमि अभिलेख यांचेकडे द्यावी.

### ३.३) ड्रोनव्दारे गांवठान भुमापन योजना पूर्ण झाल्या नंतर -सनद वाटप

गावठाण मोजणी काम पूर्ण झालेनंतर प्रथम टप्प्यात विशेष मोहीम घेवून सनद वाटप व सनद फी वसुली भूमि अभिलेख विभागाकडून करणेत येईल . तद्नंतर ग्रामसेवक यांनी शिल्लक राहिलेल्या सनदचे वितरण सशुल्क करणेचे आहे . सनद फी व शुल्क भूमि अभिलेख विभागाच्या लेखाशिर्षाखाली जमा करणे बावत अलहिदा सुचना पारित करण्यात येतील त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

## ४) विस्तार अधिकारी ( पंचायत ) यांची जबाबदारी

४.१ ग्रामसेवकाकडून उपरोक्त नमुद कामे करुन घेणे सदर कामावर नियत्रंण ठेवणे.

४.२ नमुना ८ मध्ये नोंदी अद्ययावत व ग्रामपंचायतीच्या ठरावाने प्रमाणीत करणे ,सदरील नोंदी शिल्लक राहणार नाहीत याची खात्री विस्तार अधिकारी (पंचायत ) यांनी करावी.

४.३ गावठाण भूमापन चौकशी व अनूसरण कामासाठी भूमापन अधिकारी /चौकशी अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य व मदत करणे.

## ५) गट विकास अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदा-या -

५.१) ड्रोनव्दारे गांवठान भुमापन करणेसाठी आवश्यकते मनुष्यबळ, साहित्य सामग्री इ.बाबीचे उदा. मजुर, चुना, इ. नियोजन तालुका पातळीवरील करावे.

५.२) ग्रामसेवक /विस्तार अधिकारी ड्रोनव्दारे गावठान भुमापन योजनेसंबधीचे कर्तव्य व जबाबदा-या योग्य रितीने पार पाडतात की नाही त्याची तपासणी करावी.

५.३) तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती पदाधिकारी व सदस्य, अन्य लोकप्रतिनिधी व तालुकास्तरीय प्रशासकीय यंत्रणांना अवगत करून या योजनेमध्ये सक्रीय सहभाग घेणेबाबत आवश्यक ती उपाययोजना व कार्यवाही करावी.

५.४) गावठाण भूमापन प्रकल्पाच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील अन्य प्रशासकीय विभागांच्या मिळकती /मालमत्ता असतील तर त्या विभागाचे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना अवगत करण्यात यावे.

## ६) तलाठी यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या:-

### ६.१) ड्रोन उडविण्यापूर्वी करावयाची तयारी

**६.१.१)** गावठाण हद्द निश्चितीसाठी गावठाणाच्या लगतच्या जमिनींचे गा.न.नं. ७/१२ व जमिन धारकांचे पत्ते भूमि अभिलेख विभागास देण्यात यावेत.

६.१.२) संबंधीत मिळकत धारकांना हद्द कायम मोजणीकामी ग्रामसेवकामार्फत नोटीस बजावणेकामी सहाय्य करणे आवश्यक आहे.

६.१.३) गावठाण भूमापन सुरु करणे आधी ग्रामसभेची दवंडी व जाहीर सूचना देवून ग्रामसभेस उपस्थित राहून मिळकत धारकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

### ६.२)ड्रोन भुमापन करण्याचे आदल्या दिवशीची तयारी

**६.२.१)** वाढीव गावठाणा बाबतचे सर्व्हे नं./गट नं. ची माहिती भरणेसाठी ग्रामसेवक व भूमी अभिलेख यांना मदत करणे आवश्यक आहे.

२) मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई.

३) मा. विधानसभा/मा. विधान परिषद सदस्य ( सर्व)

४) मा. राज्यपाल यांचे सचिव

५) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव

६) मा.मंत्री ( ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव

७) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव

८) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

९) अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.

१०) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.

११) अपर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई.

१२) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), मंत्रालय, मुंबई.

१३) प्रधान सचिव (नगर विकास ), मंत्रालय, मुंबई.

१४) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.

१५) जमाबंदी आयुक्त, पुणे, महाराष्ट्र राज्य.

१६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता).

१७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) .

१८) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर

१९) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

२०) सर्व विभागीय आयुक्त.

२१) सर्व जिल्हाधिकारी.

२२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२३) सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.

२४) सर्व उपायुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये.

२५) प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहायक.

२६) विधिमंडळ ग्रंथालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती).

२७) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२८) माहिती तंत्रज्ञान कक्ष/आपले सरकार कक्ष (ग्रा.वि.वि), बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

२९) निवडनस्ती, कार्यासन पंरा-४.

## परिशिष्ट अ

## ग्रामपंचायतींना होणारे फायदे

- गावठाणातील प्रत्येक मिळकतीचे मालकी हक्काचे अभिलेख मालमत्ता पत्रक (Property Card) तयार होईल.
- ग्रामपंचायतीला गावातील कर आकारणी, बांधकाम परवानगी, अतिक्रमण निर्मुलन यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होईल. त्यामुळे नियोजन करण्यास सोय व सुलभता निर्माण होईल.
- ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्ता या मालमत्ताकराच्या व्याप्तीत येतील, त्यामुळे ग्रामपंचायत महसुलात वाढ होईल.
- ग्रामपंचायतकडील मालमत्ता कर निर्धारणपत्रक (नमुना८ नोंदवही) आपोआप/ स्वयंचलनाने तयार होईल. हस्तांतरणाच्या नोंदी अद्ययावतकरणे सहज, पारदर्शक व सुलभतेने होतील.
- गावठाणाचे हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत, शासनाच्या मिळकती व सार्वजनिक मिळकती / जागा तसेच प्रत्येक मिळकतीच्या सिमा व क्षेत्र निश्चित होतील व ते जनतेस माहितीसाठी उपलब्ध होतील. त्यामुळे गावठाणातील मिळकतींचे हद्दी व क्षेत्राचे वाद कमी प्रमाणात उद्भवतील.

# परिशिष्ट -ब

## जाहीर निवेदन (जनतेच्या माहितीसाठी) चा नमुना

अत्याधुनिक ड्रोन मोजणी तंत्रज्ञानाचा वापर करुन महाराष्ट्रातील सर्व गावांचे गावठाणातील सर्व मिळकत धारकांचे मिळकतींचे, मोजमाप करुन नकाशा तसेच मिळकत पत्रिका तयार करणे संबंधी महाराष्ट्र शासन -ग्राम विकास विभाग, जमाबंदी आयुक्तालय व भारतीय सर्व्हेक्षण विभाग, डेहराडून यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यात अत्याधुनिक ड्रोनद्वारे गावठाण भूमापन कार्यक्रमास सुरुवात झाली असून अत्याधुनिक ड्रोनद्वारे अचुक व जलदगतीने सर्व्हेक्षण भूमापन मोजणी काम होणार आहे.

ड्रोनद्वारे गावठाण भूमापन हा प्रकल्प महत्त्वाकांशी व जनताभिमुख प्रकल्प असुन सदर प्रकल्पाची वैशिष्टे व ग्रामस्थांना होणारे फायदे पुढीलप्रमाणे:

- शासनाच्या मालकीच्या मिळकतींचे संरक्षण होईल.
- गावातील घरे, रस्ते, शासनाच्या/ ग्रामपंचायतीच्या खुल्या जागा, नाले यांचे क्षेत्र व सीमा निश्चित होतील व मिळकतींचा नकाशा तयार होईल
- कायदेशी हक्काचा अधिकार अभिलेख मिळकत पत्रिका (Property Card) स्वरुपात तयार होईल.
- ग्रामस्थांच्या नागरी हक्कांचे संवर्धन होईल.
- मिळकत पत्रिका तयार झाल्यामुळे घरावर कर्ज घेणेची सुविधा उपलब्ध होईल.
- मिळकतींना बाजारपेठेमध्ये तरलता येऊन गावाची आर्थिक पत उंचावेल.
- गावठाण भूमापनाची सर्व कार्यपद्धती पारदर्शकपणे राबविली जाईल व ग्रामस्थांना त्यांचे अधिकार अभिलेख सहज सुलभपणे उपलब्ध होतील.
- प्रशासकीय नियोजनासाठी गावठाण भूमापन नकाशे उपलब्ध होतील.
- उत्पन्नाचे स्तोत्र निश्चित होईल.
- गावठाणातील जमीन विषयक मालकी हक्काबाबत व हद्दीबाबत निर्माण होणारे वाद कमी करणेबाबत गावठाण भूमापन नकाशे व अभिलेखांचा उपयोग होईल.

तरी गावठाण भूमापन योजनाही अत्यंत महत्त्वपुर्ण व उपयुक्त योजना आहे . योजना यशस्वी होणेसाठी सर्व ग्राम स्थांनी आपल्या मिळकतीचे सिमांकन ग्रामसेवक व भुकरमापकाच्या मार्गदर्शनाप्रमाणे चुना पावडरच्या सहाय्याने वेळेवर करुन घ्यावे.सार्वजनिक मिळकती,शासन मिळकती विशेषतः रस्त्याच्या हद्दीचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने ग्रामविकास/ भूमि अभिलेख अधिकारी/ कर्मचारी यांना माहिती पुरवावी व योजनेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करावे ही विनंती.

## ड्रोनव्दारे गांवठाण भूमापन योजनेअंतर्गत ग्रामस्थांचे कर्तव्य व जबाबदा-या

- ग्रामसभेस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे व गावठाण भूमापनाचे महत्व , फायदे व कार्यपध्दती ज्ञात करुन घ्यावी.
- ग्रामपंचातीकडील अभिलेखामध्ये स्वत:च्या मिळकतीसंबंधी वारस नोंदी व इतर सर्व प्रकारच्या कायदेशीर हस्तांतरणाच्या नोंदी अद्ययावत करुन घ्याव्यात.
- ग्रामसेवकास स्वत:चे भ्रमणध्वनी क्रमांक व पत्ते द्यावेत. इतर मिळकत धारकाचे भ्रमणध्वनी व पत्ते माहिती असल्यास उपलब्ध करुन दयावे.
- शेजारी, नातेवाईक व मित्र यांना योजनेची माहिती देऊन योजनेची प्रसिध्दी करावी. त्याचबरोबर आपले शेजारी जे गावात रहात नाहीत परंतु त्यांची मिळकत गावात आहे अशा मिळकत धारकांना गावठाण भूमापनाची माहिती देणे त्यांचे दुरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक असे संपर्क क्रमांक कर्मचारी यांना उपलब्ध करुन दयावे.
- ड्रोन उडविण्यापूर्वी ड्रोनद्वारे गावठाण भूमापनाच्या कामास प्रत्यक्ष सुरवात करण्यापूर्वीचे आदल्या दिवशी आपल्या मिळकतीचे आपण स्वत: योग्य ते सिमांकन करावे. सिमांकनाबाबत वाद असल्यास आपआपले हद्दी सिमांकीत करुन सदर बाब ग्रामसेवक, भूकरमापक अथवा यथास्थिती भूमापन अधिकारी यांचे निदर्शनास आणावी. वेळोवेळी भूमि अभिलेख विभागाकडून देण्यात येणा-या नोटीसांना पोहोच देणे.
- सार्वजनिक, शासकीय व ग्रामपंचायत मिळकतींचे हद्दीचे सिमांकन करण्यास सहकार्य व सहाय्य करणे. सार्वजनिक मालमत्तावर कोणी हक्क सांगत असेल तर कळवावे.
- मालकी हक्काच्या चौकशीवेळी चौकशी अधिका -यासमोर उपस्थित राहून पूराव्याचे कागदपत्रे सादर करावी. चौकशी अधिका-यास सहकार्य करावे.
- मा. दिवाणी न्यायालये, इतर कोणतेही न्यायालय, प्राधिकरण,न्यायाधिशापुढील दावे , अर्ज, अपील,कोणताही, इ. सुरु,नियमित झाले असल्यास त्याची माहीती देणे.

## परिशिष्ट -क

### ग्रामसेवक यांचा, ड्रोनव्दारे गावठाण भुमापनाची पुर्व तयारी पडताळणी सूचीचा नमुना

गावाचे नाव : गावाची लोकसंख्या :

तालुका : गावातील एकूण मिळकती :

जिल्हा :

| अ.क्र | तपशिल | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| • | ड्रोन उडविण्यापूर्वी करावयाची तयारी | | |
| १ | दवंडी देवून ग्रामसभा घेतलेचा दिनांक<br>ग्रामसभेचा ठराव क्रमांक. | | |
| अ | ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करणेबाबतचे महत्व, फायदे व कार्यपध्दतीची माहिती नागरीकांना दिली आहे का? | | |
| ब | ड्रोनद्वारे भूमापन करणेपूर्वी मिळकतीचे सिमांकन कसे करावे याबाबत नागरीकांना भूमि अभिलेख विभागाच्या मदतीने माहिती/प्रशिक्षण दिले आहे का? | | |
| २ | मिळकत नोंदवही मधील कायदेशीर हस्तांतरणाच्या नोंदी व वारस नोंदी अद्ययावत करणे बाबत.<br>एकूण मिळत धारक-<br>अद्ययावत केलेले -<br>अद्ययावत करणे शिल्लक-<br>शिल्लकीचे कारणे -<br>कोणत्या दिनांपर्यंत अद्ययावत आहे.-<br>(ड्रोनव्दारे भूमापन करण्याचे दिनांकापर्यंत मिळकत नोंदवही- नमुना ८ अद्ययावत असावी.) | | |
| ३ | एकूण मिळकत धारक -<br>मोबाईल नंबर त्यांचे मिळकतीशी जोडलेल्याची संख्या - | | |
| अ | गावात रहात नसलेल्या मिळकत धारकांचे भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल व पत्ते प्राप्त करुन घेणे बावत.<br>गावात रहात नसलेल्या मिळकत धारकांची संख्या -<br>भ्रमणध्वनी क्रमांक व पत्ते प्राप्त केलेली संख्या - | | |
| ब | मिळकत रजिस्टरची एक प्रत व सॉफ्ट डेटा उप अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडे देण्यात आली आहे का ?<br>सन २०११- | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सध्याची<br>उपलब्ध करुन दिल्याचा दिनांक | | |
| ४ | सिमांकन करणे आवश्यक असलेल्या मिळकती -<br>सिमांकन केलेल्या मिळकती - . | | |
| अ | ग्रामसेवक यांनी स्थानिक स्तरावरुन किती मजूर उपलब्ध करुन दिले -संख्या<br>केव्हा उपलब्ध करुन दिले.- | | |
| ५ | गावातील सरकारी मिळकती, रस्ते, नाला, सार्वजनिक मिळकती, ग्रामपंचायत मिळकती, धार्मीक स्थळे, खुली जागा, इ. चे सीमांकना बाबत ग्रामसेवक/तलाठी यांनी जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही केली आहे का ? -<br>सार्वजनिक , शासन मिळकतीचे सिमांकनाचे वाद<br>सिमांकन करणे आवश्यक असलेल्या सार्वजनिक मालमत्ताचे सिमांकन किती केले- | | |
| • | **ड्रोन उडविणेचे आदल्या दिवशीची तयारी** | | |
| १ | सर्व खाजगी मिळकतींचे तसेच सार्वजनिक मिळकतीचे विहित पध्दतीने सिमांकन झाले आहे का?<br>सिमांकन झालेल्या एकूण खाजगी मिळकती -<br>सिमांकन झालेल्या एकूण सार्वजनिक मिळकती -<br>सिमांकन झालेल्या एकूण शासकिय मिळकती - | | |
| • | ड्रोन उडविल्यानंतर करावयाची कार्यवाही | | |
| २ | ग्राऊंड ट्रूथिंगसाठी मदत केली आहे काय ? | | |

(टिप : सदरची पडताळणी सूची संयुक्तिक स्वाक्षरीने पुढील कार्यवाहीसाठी उप अधीक्षक, भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावी)

सही
ग्रामसेवकाचे नाव -
ग्रामपंचायतीचे नाव-
मोबाईल नंबर-

६.२.२) वाढीव गावठाणाचे आदेश व उपलब्ध असल्यास नकाशा भूमी अभिलेख विभाग व ग्राम विकास विभागाकडे देणे.

६.२.३) प्रत्यक्ष ड्रोन उडविण्याच्या दिवशी सबंधित गावाच्या जागेवर हजर राहणे.

## ७) संनियंत्रण व अंमलबजावणी समित्या

सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्यासाठी जिल्हा , तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर संनियंत्रण व अंमलबजावणी समित्या गठित करण्यात येत आहेत . सदर समित्यांनी दर आठवड्याला आढावा घ्यावा.सदरील समित्यांची रचना खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | स्तर | सदस्याचे पदनाम | समिती पद |
|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तर | १.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| | | २.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| | | ३.पोलीस अधीक्षक | सदस्य |
| | | ४.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद | सदस्य |
| | | ५.जिल्हा सूचना विज्ञान केंद्र अधिकारी | सदस्य |
| | | ६.नगर रचनाकार | सदस्य |
| | | ७.जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| | | ८. अधीक्षक ,भूमी अधिलेख | सदस्य-सचिव |
| २. | तालुका | १.उपविभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| | | २.तहसीलदार | सदस्य |
| | | ३.पोलीस निरीक्षक | सदस्य |
| | | ४.गट विकास अधिकारी | सदस्य |
| | | ५.विस्तार अधिकारी(पंचायत) | सदस्य |
| | | ६. उपअधीक्षक,भूमी अभिलेख | सदस्य-सचिव |
| ३. | गाव | १. मंडळ निरीक्षक | अध्यक्ष |
| | | २. ग्रामसेवक | सदस्य |
| | | ३. तलाठी | सदस्य |
| | | ४. केंद्र चालक (आपले सरकार सेवा केंद्र/संग्राम केंद्र) | सदस्य |
| | | ५. सर्वेअर | सदस्य-सचिव |

८) <u>जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची कर्तव्ये व जबाबदा-या</u>

गावठाण जमाबंदी प्रकल्पाबाबत आयोजित कार्यशाळा, प्रशिक्षण याकरीता विनामुल्य जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत यांचे सभागृह उपलब्ध करुन दयावे.

९) <u>जिल्हास्तरिय समितीचे कर्तव्य</u>

<u>लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणांना माहिती देणे</u>- गावठाण जमाबंदी प्रकल्पाबाबतच्या ग्रामविकास विभागाच्या क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१३/मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये भूमि अभिलेख विभाग व ग्राम विकास विभागा कडून देण्यात आलेले आदेश / सुचना या बाबत सर्व लोकप्रतिनिधी व सर्व प्रशासकीय यंत्रणांना माहिती व्हावी व त्यांचा या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सक्रीय सहभाग व्हावा याकरीता आवश्यक ती कार्यवाही करावी.

१०)<u>प्रकल्पाची प्रसार,प्रचार,प्रसिद्धी व जाहिरात करणे</u>

गावठाण जमाबंदी प्रकल्पाची माहिती जनसामान्यांपर्यंत होणे आवश्यक आहे . त्यानुषंगाने गावठाण जमाबंदी प्रकल्प विषयक प्रसार,प्रचार,प्रसिद्धी व जाहिरात करण्याची जबाबदारी जमाबंदी आयुक्त कार्यालय यांनी करावी.

सदर शासन परिपत्रक, गावठाण जमाबंदी प्रकल्पाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी आपल्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावा तसेच त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

११) गावठाण भूमापन प्रकल्पाच्या अनुषंगाने कॉर्स रोअर स्टेशन उभारण्याकरिता ग्रामविकास विभाग,महसूल विभाग व अन्य प्रशासकीय विभागांच्या मिळकती/मालमत्ता चा वापर करण्यास मान्यता असल्याचे समजण्यात यावे.

सदर परिपत्रक महसूल व वनविभागाच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००१२१११२०४८७३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PANDIT KAHANDERAO JADHAV

Digitally signed by PANDIT KAHANDERAO JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=[illegible]
postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=[illegible], ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PANDIT KAHANDERAO JADHAV
Date: 2020.02.01 12:48:40 +05'30'

पं.खं.जाधव

उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.